अफाट आकाश
हिरवी धरती
पुनवेची रात
सागर-भरती
पाचूची लकेर
कुरणाच्या ओठी
प्रकाशाचा गर्भ
जलवंती पोटी
अखंड नूतन मला ही धरित्री
**आनंदयात्री मी आनंदयात्री**



# आनंदयात्री मंगेश पाडगावकर

डॉ. उषा खंदारे

# अनुक्रमणिका


मंगेश पाडगावकर ........................................ १

आठवणींच्या हिंदोळ्यावर ........................................ ३२

पारदर्शी व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू ........................................ ५४

प्रस्तावनेतून उलगडलेलं अंतरंग ........................................ ५७

प्रेम म्हणजे प्रेम असतं ........................................ ९१

शतदा प्रेम करावे ........................................ १०४

श्रावणात घन निळा बरसला ........................................ ११५

विनोदी काव्यांतील विषमतेचं दर्शन ........................................ १३३

आता खेळा नाचा ........................................ १६०

भावविश्वातून साकारलेलं मौलिक विचारधन ........................................ १८८

उद्‌गार सामाजिक जाणिवेचा ........................................ १९८

असा कवी होणे नाही ........................................ २२६

कवितेच्या नभांगणातील तेजस्वी शुक्रतारा ........................................ २५३

आनंदयात्री मी आनंदयात्री ........................................ २७१

मान्यवरांचे गौरवोद्‌गार ........................................ २८४

मान्यवरांनी केलेला जिप्सीला सलाम ........................................ ३००

गाणी मनामनातली ........................................ ३३२

सन्मानाचे सोनेरी क्षण ........................................ ३४४

# अंतरंग

'आनंदयात्री- मंगेश पाडगावकर' हे पुस्तक वाचकांच्या हाती देताना, माझ्या मनात संमिश्र भावना आहेत. याचं कारण असं की त्यांच्या जीवन, साहित्य, काव्य आणि कार्य यावर एक पुस्तक लिहावं असं खूप दिवसापासून माझ्या मनात होतं. पण योग काही जुळून येत नव्हता आणि ज्यावेळी तो जुळून आला त्यावेळी मात्र ते आपल्यात नाहीत याचं मनाला अतिशय दुःख झालं.

१९९० या सालातील ही गोष्ट. मी त्यावेळी इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या महात्मा फुले कन्या शाळेत उप-मुख्याध्यापिका या पदावर काम करत होते. त्याच शाळेत श्रीम. उषा शशी मेहता या मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत होत्या. १५ ऑगष्ट हा स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम झाल्यानंतर श्री. मंगेश पाडगावकर यांच्या काव्यवाचनाचा कार्यक्रम त्यांनी आयोजित केला होता. नेमका त्या दिवशी सकाळीच खूप पाऊस पडला. शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्ग त्यांच्या येण्याची वाट पाहत होता. शाळेतील एक शिक्षिका श्रीम. डिंगणकर या आणायला त्यांच्या घरी गेल्या होत्या. मुंबईचा पाऊस आणि किंग सर्कलजवळचं पाणी तुंबणं हा तर नित्याचाच अनुभव मुंबईकरांना असतो. त्या भागात पाणी इतकं साचलं होतं की अनेक वाहनं त्या पाण्यात बंद पडली होती. सर्वांनाच वाटलं की आता काही पाडगावकर येणार नाहीत. पण दिलेल्या शब्दांना जागणं आणि 'दिल्या घेतल्या वचनाची शपथ आहे' तुला असं केवळ काव्यातून न सांगता प्रत्यक्ष तसंच जगणारे, किंबहुना हाच जीवनाचा मूलमंत्र जपणारे पाडगावकर तेवढ्या पावसातही थोडं उशिरा का होईना पण शाळेत आले. साधारणपणे गप्पा आणि काव्यवाचन हा त्यांचा कार्यक्रम जवळपास एक तास चालला होता.

बाहेर पाऊस पडत होता आणि त्याचवेळी पाडगावकरांच्या काव्यानं आम्हीही सारे मंत्रमुग्ध होऊन काव्यरसात चिंब भिजून गेलो. त्यांच्या काव्यवाचनाचा कार्यक्रम संपला नि बाहेर पाऊसही थांबला. हा योगायोग की आणखी काही माहीत नाही पण निसर्ग आणि काव्यवाचन या दोहोतील उत्कट अनुभूती आम्ही सर्वांनीच घेतली. हा आनंदाचा अनुभव आम्हाला अर्थातच श्रीम. उषा मेहता

यांच्यामुळेच मिळाला हे ही मुद्दाम मला सांगावसं वाटतं.

त्यानंतर दोन तीन वेळा मी त्यांच्या काव्यवाचनाचा आस्वाद घेतला. पण त्यांच्या भोवती चाहत्यांचा पडणारा गराडा पाहून आपोआप पावलं मागे वळायची. इच्छा असूनही फारसं त्यांच्याशी बोलता आलं नाही. दर्शन मात्र होई. त्यावेळी एकच विचार मनात येई, पाडगावकर इतके मोठे कवी/ साहित्यिक आहेत. त्यांचं दर्शन घेता येतं हेच माझ्यासाठी खूप महत्त्वाचं आहे. त्यांच्या साहित्याचा आस्वाद घेणं हे मधून मधून चालूच असायचं.

यानंतर मात्र त्यांच्या भेटीचा योग मला आला जो माझ्यासाठी चिरंतन ठेवा ठरला. माझ्या 'महाराष्ट्र भूषण' या पुस्तकाचे प्रकाशन रविवार दि. २३ फेब्रुवारी २०१४ रोजी ठाणे येथील नरेंद्र बल्लाळ सभागृहात मंगेश पाडगावकरांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्यांनी माझे आणि या पुस्तकाचे भरभरून कौतुक केले. माझ्या जीवनातील हा सुवर्णक्षणच! मी माझ्या पुस्तकावर त्यांची सही घेतली. त्यावेळी त्यांनी माझ्याशी थोड्या गप्पाही मारल्या. त्यावेळीही त्यांच्या सभोवती चाहत्यांचा गराडा पडलेलाच होता. चाहत्यांकडून इतकं भरभरून प्रेम फक्त भाग्यवान लोकांनाच मिळतं. त्यादृष्टीने पाहिलं तर पाडगावकर हे भाग्यवानच म्हणायला हवेत.

पुस्तक प्रकाशनाच्या वेळी परत माझ्या मनानं निश्चय केला. मागे पडलेला विचार पुन्हा उभारी घेऊन वर आला. कदाचित पाडगावकरांनी केलेलं कौतुक हे देखील एक निमित्त ठरलं असावं. त्यांच्यावर पुस्तक लिहायचं त्याचवेळी मनाशी ठरवलं पण हातात काही पुस्तकं होती, जी अंतिम टप्प्यात होती. ती प्रथम पुरी करणं आवश्यक होतं. तिथेच माझा अंदाज चुकला. असं वाटतं की त्याचवेळी मी जर हे पुस्तक पूर्ण केलं असतं तर निदान पाडगावकरांना दाखविलं तरी असतं. त्यांना खूप आनंद झाला असता. पण नियतीच्या मनात वेगळं होतं. ते इतक्या लवकर जातील असं कधीही वाटलं नाही. कारण त्यांची प्रकृतीही चांगली होती. नागिणीचा पाश पुन्हा एकदा इतका घट्ट झाला की, त्यातून त्यांची सुटका झाली नाही. माझं हे पुस्तक पूर्ण झालं पण मी हे पुस्तक दाखवू शकले नाही हे शल्य मात्र माझ्या मनात कायमचं राहिलं.

३० डिसेंबरला (२०१५) ते अनंतात विलीन झाले पण त्यांच्यावरील श्रद्धांजलीचे कार्यक्रम सर्व थरांतून महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात होत राहिले.

कुणी भाषणांतून तर कुणी संगीताच्या माध्यमातून तर कुणी काव्यवाचनातून आपल्या भावना व्यक्त केल्या. हे सर्व पाहून एकच विचार मनात आला तो म्हणजे 'असा कवी होणे नाही'

एखाद्या व्यक्तीवर पुस्तक लिहायचं म्हटलं म्हणजे त्यांच्या साहित्याचा सर्वकष अभ्यास, वाचन आणि चिंतनही आलंच. पाडगावकरांची ग्रंथसंपदा इतकी विपुल की काव्यसंग्रह वाचता वाचता माझी कितीतरी वेळा दमछाक झाली. त्यांची प्रेमगीतं, भावगीतं, देशभक्तीपर गीतं, सामाजिक, निसर्ग, बालगीतं, वात्रटिका, माणूस, जीवन, देव, ग्रंथ, भ्रष्टाचार, पाऊस, पक्षी, नद्या, पाने, फुले एक की दोन अगणित विषय अशा या अफाट काव्याच्या सागरात संचार करताना जाणवलं की किती काव्यभांडार आहे. यातलं काय काय घेऊ ? या अफाट पसाऱ्यात नेमकं काय शोधायचं ? याचाच मला अनेकवेळा संभ्रम पडला. त्यांच्या काव्य सागरातील अनेक मोती मी वेचले हे मोती वेचत असताना अनेकवेळा हदयाच्या तारा झंकारल्या तर कधी डोळ्यांच्या कडाही पाणावल्या.

त्यांच्या प्रेमकवितातील विशुद्ध प्रेमाची साक्ष आणि सादही प्रत्येकाच्या मनातील. म्हणूनच कदाचित असेल अगदी साठीतील व्यक्तीही आपलं प्रेम व्यक्त करेल हीच या काव्यांची थोरवी ! हे पुस्तक लिहित असताना अनेकवेळा त्यांचे काव्यवाचन आणि त्यांची भावगीतं यूट्यूबवर ऐकली. या माध्यमातून त्यांना पुन्हा पुन्हा भेटण्याचा योग आला. ही विज्ञान-तंत्रज्ञानाची किमया. परंतु त्याच व्यक्तीला प्रत्यक्षात भेटणं हा सुवर्ण क्षण असतो ही जाणीव पुन्हा पुन्हा तीव्रतेनं होत राहिली.

सामाजिक व्यवस्थेवर, ढोंगीपणावर, अंधश्रद्धेवर आणि खोट्या प्रतिष्ठेवर त्यांनी आपल्या काव्यातून जे आसूड ओढले ते मनाला तर भावलेच पण सामाजिक जाणिवेची जाणही त्यांनी करून दिली. आजची परिस्थिती अत्यंत विदारक आहे. आपण या दलदलीतून बाहेर तरी कधी पडायचं ?

अनेकदा मनात निराशा येते, जगण्याची इच्छाच मरून जाते. अशावेळी 'या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे' हे शब्द आणि त्यातील सूर ऐकू येतात आणि मनात साठलेले हे निराशेचे काळे ढग हळूहळू निघून जातात. पुन्हा मन कसं हिरव्या पानासारखं टवटवीत होतं. निसर्गातील चैतन्याने मनालाही भुरळ पडते. मनुष्य सगळी शक्ती एकवटून दु:खाला सामोरे जातो आणि मनात जगण्याची इच्छा पुन्हा बाळगतो. शब्दांचं हे सामर्थ्य दाखविलं केवळ

पाडगावकरांनीच!

त्यांनी जीवनाचे सहर्ष स्वागत केले. त्यांनी निसर्गातील अनेक गोष्टीत आनंद शोधला, तो घेतला आणि रसिकांनाही भरभरून दिला. निसर्गाची सुंदर भावचित्रे त्यांनी आपल्या विविध काव्यांतून रेखाटली. त्यातूनच त्यांच्या संवेदनशील भाववृत्तीचा आविष्कार दिसतो. त्यांचे मन सतत नावीन्याचा शोध घेत राहिले. आणि हा शोध घेत असतानाच त्यांनी जीवनमूल्यांचाही शोध घेतला आणि तो आपल्या अनेक काव्यांतून व्यक्त केला.

आपण कसं जगायचं हा ही मूलमंत्र त्यांनी आपल्याला दिला. मानवी जीवनात दु:ख हे अपरिहार्य असतं. मग त्या दु:खाला कायम का चिकटून राहायचं ? हे त्यांना पटत नसे. म्हणूनच पेला अर्धा भरलेला आहे की रिकामा हे तुम्हीच ठरवा असं आपल्यालाच त्यांनी सांगितलं. एका वाक्यात पण जीवनाचं तत्त्वज्ञान सांगणारा हा तत्त्वज्ञ कवी! खूप काही तर सांगतोच याशिवाय सकारात्मक ऊर्जा देऊन मानवी जीवनाचा गहन अर्थही स्पष्ट करतो.

जो कविता करतो त्याला आनंद मिळतोच पण जो कविता वाचतो त्यालाही आनंद मिळतो. पाडगावगरांनी हा आनंद रसिकांना भरभरून दिला. म्हणूनच आपण सारे त्यांच्या प्रती कृतज्ञ आहोत.

आपल्या सर्वांना मंगेश पाडगावकर हे फार मोठे कवी वाटतात. त्यांचं मोठेपण त्यांच्या अनेक काव्यांत आढळतं. याच काव्यांतून त्यांनी प्रत्येकाच्या मनात डोकावण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच महाराष्ट्रातील प्रत्येकजण त्यांच्या काव्यात अगदी समरसून गेला. 'सुरवंट आणि फुलपाखरू' या कवितेत ते म्हणतात- खरंतर कवी हा सर्वांसारखाच असतो.

कवी कुठे वेगळा असतो ?
तुमच्यासारखाच सगळा असतो.
तोही सर्वांसारखा श्वास घेतो, जेवतो.

इतकंच काय आश्चर्य वाटलं की, तो ही 'आ' वासतो. असं जरी असलं तरी त्याचं वेगळेपण सांगताना मात्र ते म्हणतात-

भाषेची चाहूल मात्र लागते जेव्हा
तुमच्याहून वेगळा असतो कवी तेव्हा
तुम्ही भाषा वापरता,

तो भाषेत भिजून येतो
तुमचं वाक्य सांगून संपतं
तो वाक्यात रूजून येतो
तुमच्याकडे भाषा असते
सुरवंट होऊन आलेली
त्याच्याकडे पंख फुटून
फुलपाखरू झालेली !
म्हणूनच कवी हा मोठा असतो.

हे त्यांनी अगदी नेमकेपणानं सांगितलं. एकप्रकारे इतरांहून वेगळं असलेलं त्याचं श्रेष्ठत्व पण अगदी अलगदपणे साकारलेलं !

शब्दांच्या सानिध्यातच कवीला अनेक काव्यांचे घुमारे फुटतात. त्यांनी केलेलं हे वर्णन

का बरं असं होतं मलाच नसे कळत
मी भिऊच नको म्हटलं तरी शब्द येत
आणि माझे लाड करीत, मला जवळ घेत
मग मीही जुळवू लागलो शब्द असे तसे
माझे शब्द होत पक्षी, झरे, डोंगर, ससे

असा हा कवी कुणी कितीही उपेक्षा केली तरी तो कवीच असतो. कारण त्याचाही मग नाईलाज असतो म्हणूनच त्यांनी आपले भाव व्यक्त केले ते असे-

मी तरी काय करू ? शब्दच जर येतात
माज्या गळ्यात गळा घालून मला जवळ घेतात
शब्दांची गळाभेट अशी असते.

त्यामुळेच कवी उत्तुंग विचारांचा होऊ शकतो हे पाडगावकरांनी सार्थ ठरविलं.

गेल्या पाव शतकाच्या या काळात नवनवे कवी आलेच नाहीत असे नाही त्यांनी त्यांच्या त्यांच्या कुवतीप्रमाणे नाव कमावले. त्यांचा चाहता वर्गही निर्माण झाला. परंतू कोणी पाडगावकर होऊ शकले नाही.

आजच्या अत्यंत धकाधकीच्या आणि स्पर्धेच्या युगात माणसांतील ऋजुता कायम राहते ती केवळ त्यांच्या काव्यांमुळे ! दोन घटका मनाला केवळ विश्रांतीच

मिळत नाही तर जीवनाच्या अर्थाचे आणि हर्षाचे तुषार निर्माण करून त्यांची कविता मनाला ओलेचिंब करते. पाडगावकरांच्या कवितांत त्यांच्या प्रतिभेचा, कल्पकतेचा आणि सकारात्मक दृष्टिकोनाचा आविष्कार दिसतो. म्हणूनच प्रत्येक रसिकाला ती कविता आपली वाटते. त्यांनी काव्यातून कायमच सामान्यजनांची मनं फुलविली.

त्यांच्या काव्यातील आशय व्यक्त करण्याची किमया आणि एकूणच जीवनाकडे बघण्याची दृष्टी यामुळे त्यांची कविता नेहमी सतेज राहिली. या काव्याची प्रत्येकाला ओढ वाटली म्हणूनच त्यांचं काव्य एखाद्या मर्यादेपुरतं सीमित न राहता ते सर्वव्यापी राहिलं.

जीवनात, निसर्गात अगदी स्वत:च्या सानिध्यात जे जे सुंदर आहे त्यावर त्यांनी मनसोक्त प्रेम केलं. त्या सुंदरतेची फुलं त्यांच्या मनाला मोहून गेली. त्या फुलांची त्यांनी अतिशय सुंदर अशी काव्यं केली. ही काव्यं सर्वांना आवडली. कित्येकजण त्यात तन्मयतेने डुंबत राहिले तर काहीजण मन तृप्त होईपर्यंत आस्वाद घेत राहिले. आजही कित्येक जण त्या काव्याचं अविरतपणे श्रवण करतात. काही काव्यं मनाला उभारी देतात तर काही जगण्याचं बळ देतात. हेच त्या काव्यांना मिळालेलं मोठेपण!

त्यांची अनेक गाणी ध्वनिमुद्रित झाल्यामुळे देशात त्याचप्रमाणे परदेशातही ती खूप लोकप्रिय झाली. समर्थ कवी असूनही ते कधीही सिनेमाकडे वळले नाहीत. एखादा प्रसंग पाहून त्यांनी कधी गाणी रचली नाहीत. जेव्हा जेव्हा त्यांचे गाणे फुलले तेव्हाच त्यांनी ते लिहिले. ते नेहमी म्हणत- 'कवीची कविता हे प्रत्येक कवीने स्वत:शी आणि जीवनाशी राखलेले सर्वश्रेष्ठ इमान आहे.'

रसिकांच्या/ चाहत्यांच्या प्रती त्यांनी नेहमीच कृतज्ञता व्यक्त केली. म्हणूनच 'माणूस बनवलंत तुम्ही' अशी नम्रतेची भूमिका त्यांनी स्वीकारली. जीवनातील प्रत्येक क्षणाचा आनंद घेणारा हा आनंदयात्री आठवणींतून काव्यातून भेटणारच आहे पण त्यांचं अस्तित्व... असंख्य काव्यांतून ते पिढ्यान्‌पिढ्या स्मरणात राहणार आहेत. त्यांनी अनेक काव्यांचा खजिनाच रसिकांपुढे रिता केला. कधीही घ्या, कितीही घ्या. मनसोक्त त्याचा आस्वाद घ्या. त्यांच्या या तेजस्वी काव्यप्रतिभेला विनम्र अभिवादन!

या पुस्तकाच्या निमित्ताने त्यांच्या अनेक काव्यांचं वाचन पुन्हा पुन्हा झालं.

त्यांच्या साहित्याच्या आस्वादाबरोबरच त्यांचं श्रेष्ठत्व, त्यांचं उत्तुंग व्यक्तिमत्त्व, त्यांनी जोडलेली मित्रमंडळी, त्यांचे असंख्य चाहते आणि त्यांचे विविध पैलू या साऱ्याच गोष्टी दिपवून टाकणाऱ्या आहेत.

हे पुस्तक पूर्ण झालं, माझीही इच्छा फळाला आली पण एक खंत मात्र कायम राहिली... श्री मंगेश पाडगावकरांना या पुस्तकाची पहिली प्रत द्यायची होती पण.....

कोमल प्रकाशनचे श्री गुरूनाथ शेटये आणि त्यांच्या पत्नी सौ. कांचन शेटये यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मनापासून आभार. त्यांचीही इच्छा होती तीही अर्थात पूर्ण झाली.

या पुस्तकाचे अतिशय सुंदर मुखपृष्ठ श्री. चंद्रशेखर बेगमपुरे यांनी अल्पावधीत काढून दिले त्यांचेही मनापासून आभार. श्री. विजय केदारे, सौ. संध्या केदारे आणि श्री. विकास साटम यांचे सहकार्य नेहमीच मिळते. त्यांच्यामुळे माझी अनेक कामे वेळेवर पूर्ण होतात. त्यांचे खूप खूप आभार.

प्रा. माणिकराव कीर्तने वाचनालय, वाशी, नवी मुंबई येथील ग्रंथपालांनी मला पाडगावकरांचे काव्यसंग्रह वेळोवेळी उपलब्ध करून दिले त्याबद्दल त्यांचेही मनापासून आभार.

ज्या वाचकांच्यामुळे मला सतत प्रेरणा मिळते, लेखनासाठी ऊर्जा मिळते, अनेक वाचक मला फोन करून अभिप्राय देतात, महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून अनेक वाचक माझ्याशी संवाद साधतात त्या असंख्य वाचकांचे खूप खूप आभार. या सर्व वाचकांचे अभिप्राय ऐकताना मन भरून येतं. अनेक वाचक मला नव्याने भेटतात. त्यांच्याशी केलेला संवाद हा माझ्यासाठी अनमोल ठेवाच ठरतो. त्यांच्या प्रती ही कृतज्ञता!

डॉ. उषा खंदारे.



**डॉ. उषा खंदारे**
एम.ए., एम.एड., पीएच.डी.

मंगेश पाडगावकरांच्या प्रेम कवितांतील विशुद्ध प्रेमाची साक्ष आणि सादही प्रत्येकाच्या मनातील, म्हणूनच कदाचित असेल अगदी साठीतील व्यक्तीही आपलं प्रेम व्यक्त करेल हीच या काव्यांची थोरवी! अनेकदा मनात निराशा येते, जगण्याची इच्छाच मरून जाते अशावेळी 'या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे' हे शब्द आणि त्यातील सूर ऐकू येतात अन मनात साठलेले हे निराशेचे काळे ढग हळूहळू निघून जातात. पुन्हा मन कसं हिरव्या पानासारखं टवटवीत होतं. मनुष्य सगळी शक्ती एकवटून दुःखाला सामोरे जातो आणि मनात जगण्याची इच्छा पुन्हा बाळगतो. शब्दांचं हे सामर्थ्य दाखविलं केवळ पाडगावकरांनीच!

जीवनात, निसर्गात अगदी स्वतःच्या सानिध्यात जे जे सुंदर आहे, त्यावर त्यांनी मनसोक्त प्रेम केलं. त्या सुंदरतेची फुलं त्यांच्या मनाला मोहून गेली. त्या फुलांची त्यांनी अतिशय सुंदर अशी काव्यं केली. ही काव्यं सर्वांना आवडली. कित्येकजण त्यात तन्मयतेने डुंबत राहिले तर काहीजण मन तृप्त होईपर्यंत आस्वाद घेत राहिले. आजही असंख्य रसिक त्या काव्यांचं अविरतपणे श्रवण करतात. काही काव्यं मनाला उभारी देतात तर काही जगण्याचं बळ निर्माण करतात. हेच या काव्यांना मिळालेलं मोठेपण!

(अंतरंगमधून)

कोमल प्रकाशन